(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. IX / Issue – IV ISSN 2277-8063

# जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत महात्मा गांधीच्या ग्रामस्वराज्य संकल्पनेची प्रासंगिकता

डॉ. अनुराधा कदम, अमरावती. मो.९४२३९११७४६

**प्रस्तावना:**

महात्मा गांधीची सामर्थ्यशाली भारतासंबंधीची संकल्पना 'ग्रामपुनर्निमाण' कार्यक्रमावर अधिष्ठीत राहिलेली आहे. या संदर्भात गांधींची स्पष्ट धारणा अशी होती की, भारताचे खरे वास्तव्य खेडे–गावांमध्ये असुन जोपर्यंत ग्रामसुधार, ग्रामपुन:निर्माण व विकासाची प्रक्रिया होणार नाही तोपर्यंत समग्र भारताची प्रगती होणार नाही. गांधीजी या संदर्भात असे म्हणाले होते की, ''यदि भारत को विनाश से बचाना है तो हम सीढी के सबसे निचले भाग से शुरू करना होगा ! यदि निचला भाग सडा हूआ है तो उपर और बाकी हिस्सो पर किया गया काम अन्त मे गिर पडेगा ग्राम विकास के संदर्भ में शहर–गाँव का प्रतिरोध मुख्य समस्या है–गाँव का शोषण हिंसा है!'' सांप्रत परिस्थितीचा विचार केला असता असे निदर्शनास येते की, प्रगती–उन्नती–विकासाच्या नावावर सृष्टी सौंदर्याचा नाश केल्या जात आहे. वसुंधरेला जबरदस्त धक्के दिल्या जात असून या देशातले मुलनिवासी आदिवासी जनजाती समुदायांचे फार मोठया प्रमाणात विस्थापन होत आहे. विवेकशून्य पद्धतीने नैसर्गिक साधनसंपत्ती नष्ट केल्या जात आहे. हवा, पाणी, जमीन, जंगल आणि खाद्यान्न व्यापक प्रमाणात प्रदुषित होत आहे. जगातील विकसित देश तंत्रज्ञानात्मक हस्तान्तरणाच्या निमित्याने आपली इच्छा गरीब–गरजू देशांवर थोपवतांना दिसतात. बहुराष्ट्रीय कंपन्या 'मल्टी ब्रँण्ड' च्या नावाखाली देशाला व देशाच्या सार्वभौम शक्तीला प्रभावित करीत आहे. अर्थात नवसाम्राज्यवाद 'विकासाचा भ्रममूलक' चेहरा घेऊन आकारास आलेला आहे. फिल गुड–इंडिया शायनिंगच्या नावाखाली 'बदला भारत बदली दुनीया' या आशयाचे एक आभासी जग जागतिकीकरणाची अपरिहार्य परिणती होय. जागतिकीकरणातून निर्माण झालेले हे आभासी जग माणसाला अधिकच भ्रमिष्ट आणि वेगळया अर्थाने सभ्य समाजात घेऊन आपली जिंदगी कशीबशी व्यथित करणारा 'चेहरा नसलेला भारत' आपल्या दृष्टिक्षेपात दिसतो. भारतामध्ये करोडो भारतीय अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षण इत्यादी मूलभूत गरजांपासून वंचित आहेत. भारतीय ग्राम्यजीवन पुर्णत: वंचित व कुंठीत व अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत दिवस काढत असतांना शॅम्पू, विविधांगी वेशभूषा वस्त्रालंकारीत कपडे, महागडया गाडया यांचा दृक–श्राव्य इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून प्रचार–प्रसार करण्यामागचे औचित्य काय असावे? हा कळीचा प्रश्न आहे. मेळघाट आणि तत्स्म प्रदेशातील लाखो आदिवासी महिला व बालके जी शुद्ध, स्वच्छ पिण्याच्या पाण्याअभावी कुपोषित आहेत. कुपोषित समाज प्रगतीच्या मार्गापासून कोसोदूर असून जगण्यासंबंधी अत्यावश्यक सुविधांपासून वंचित आहे. दुसरीकडे कोला–पेप्सी इत्यादी शीतपेयाच्या भंपक जाहिरातींचा प्रचंड भडीमार....? भारतातील लाख्खो–करोडो तहाणलेल्या ग्रामीण भारतीयांच्या जीवनात आशेचा किरण आणण्यासाठी या मातीशी इमान ठेवणारा मानवधर्म जो गांधीजींनी आपल्या 'मेरे सपनो का भारत' मध्ये प्रतिध्वनीत केला त्या 'ग्रामस्वराज्य' संकल्पनेच्या प्रस्थापनेशिवाय आज दुसरा प्रबळ पर्याय दृष्टिक्षेपात येत नाही.

गांधीपुरस्कृत 'ग्रामस्वराज्य' अर्थात रामराज्य हे खऱ्या अर्थाने प्रजाहितदक्ष राज्य असेल, सांप्रत भयावह परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी गांधीपुरस्कृत व्यापक दृष्टी जोपसणाऱ्या प्रशस्त मार्गाने मार्गस्थ होण्याची नितांत आवश्यकता आहे; जो मार्ग अंधारातून प्रकाशाकडे, अन्यायाशिवाय सन्मानजनक वर्तणूक आणि विनाशाशिवाय मानवाच्या संपूर्ण उन्नतीकडे मार्गस्थ करेल. गांधीपुरस्कृत 'ग्रामस्वराज्य' संकल्पना एक दिव्य प्रकाशस्तंभ म्हणून प्रतिध्वनीत होतो. ग्रामोद्धर आणि सर्वोदय या दोन्ही अंगांना भारतीय ग्राम्यजीवन व्यापून टाकते[१]. परिणामस्वरूप जागतिकीकरणावर एक सक्षम पर्याय या अर्थाने 'ग्रामस्वराज्य' संकल्पना कालसंगत व प्रासंगिक ठरते.

महात्मा गांधीनी राजकीय तत्वज्ञानाच्या माध्यमातून 'सामान्यातल्या सामान्य–दारिद्रयात खितपत पडलेल्या माणसाची वेदना, दु:ख, दैन्नवस्था जाणून 'मेरे सपनों का भारत' अर्थात 'ग्रामस्वराज्य' संकल्पनेची उभारणी केली. गांधीजीनी तत्कालीन हिंदुस्थानच्या भ्रमंतीतून, अवलोकनातून हिंदुस्थानी खेडे जीवनाच्या भयावह परिस्थितीची जी चिंता व्यक्त केली त्या चिंता णिि चिंतनाचा निचोड त्यांनी भारतीयांना दिलेला 'खेडयाकडे चला' चा नारा होय. औद्योगिकीकरण, यांत्रिकीकरण, बाजारीकरण, पाश्चिमात्यकीकरण हयांचा परिपाक म्हणजे जागतिकीकरण!जे आज भारतीयांच्या अस्मिता आणि अस्तित्वाला आव्हान देत आहे. महात्मा गांधीनी १९०९ साली लिहिलेल्या 'हिन्दस्वराज्य' या ग्रंथातून स्वतंत्र्य भारतासमोर उभे राहणारे संभाव्य आव्हान आणि त्या आव्हानासंबंधी चिंता न चिंतन आणि त्यातुन निघण्याचा मार्ग व्यक्त केला होता[२].

भारतीयांना आपले स्वत्व, अस्तित्व आणि एक स्वतंत्र्य राष्ट्र म्हणून अस्तित्व निर्माण करण्यासाठी 'खेडे–गावांच्या' सर्वांगीण प्रगतीचा ध्यास आणि तत्संबंधी नियोजनपुर्वक प्रयास केल्याशिवाय पर्याय नसल्याचा मूलगामी विचार गांधीजींनी मांडला, भारताच्या सर्वांगिण विकासाच्या मार्गात आज जे विविधांगी अडथळे निर्माण होत आहेत, त्यामध्ये राज्यकर्त्यांची नीती व नियतीसंबंधी विसंगती हा एक मुख्य अडथळा होय. गांधीजीनी भविष्यातील संकटासंबंधी अचूक वेध घेऊनच 'भारताच्या प्रगतीसंबंधी प्रारूप' हिंदस्वराज्यामधून व्यक्त केले. आज एकविसाव्या शतकामध्ये विकासाची मोठी ध्येय घेण्यासंबंधी मनिषा बाळगतांना जे भारतीत्वाचे संचित लाखों खेडयामध्ये वंचित अवस्थेत आहे, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत 'वंचिताच्या काळवंडलेल्या चेहरावर समाधानाची रेषा कशी उमटविता येईल' हा मुद्दा ग्रामस्वराज्य संकल्पनेची प्रासंगिकता अधोरेखित करतो.

**म. गांधी प्रणीत ग्रामस्वराज्य संकल्पनेची प्रासंगिकता :**

महात्मा गांधीचे आर्थिक विचार सामाजिक व राजकीय क्षेत्रांतील त्यांच्या अध्यात्मनिष्ठ मानवतावादाशी सुसंगत असेच आहेत. विद्यार्थिदशेत इंग्लंडमध्ये राहत असताना कार्लाईल, रस्किन, थोरो इत्यादी आदर्शवादी तत्वचिंतकांनी भांडवलशाही व्यवस्थेवर केलेल्या टीकेचा त्यांचा मनावर खूपच प्रभाव पडला. स्पर्धेवर आधारलेली ही अर्थव्यवस्था माणसाला स्वयंकेंद्रित व स्वार्थी बनविते असा या विचारवंताच्या टीकेचा रोख होता. तिला पर्याय म्हणून लहान लहान गटांची स्वायत्ता व त्यातील सर्व व्यक्तींचे स्वयंस्फूर्त सहकार्य या तत्वांनुसार चालणाऱ्या छोटया वसाहतींचे त्यांनी जवळून संबंध आला. 'खेडयातील स्वयंपूर्ण ग्रामसंस्था नव्या विकेंद्रित अर्थव्यवस्थेला पायाभूत बनू शकेल अशी आशा त्यांनी मनाशी बाळगली; आणि त्या दृष्टीने आपल्या विधायक कार्यक्रमाची त्यांनी आखणी केली[३]. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेते या नात्याने राष्ट्राच्या आर्थिक हितसंबंधाची जपवणूक करण्याची जबाबदारी त्यांना पत्करावी लागली. त्यामधून त्यांच्या विचारांना राष्ट्रवादाची जोड मिळाली; याचा प्रत्यय येतो.

पहिल्या महायुद्धानंतर भारतामध्ये समाजवादी विचारांचे वारे वाहू लागले होते. गांधींचा या काळात निरनिराळया प्रवृत्तीचा लोकांशी संवाद चालू होता. त्यांच्या प्रश्नांना उत्तर देताना गांधीनाही आपल्या अनेक कल्पनांना मुरड घालावी लागली. यंत्रांना असणारा त्यांचा कडवा विरोध कमी झाला. मोठया उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीयीकरणाचे तत्व त्यांनी मान्य केले. मात्र शासनसंस्थेवरचा त्यांचा अविश्वास कायम होता. लोकशक्ती जागृत करून सत्याग्रही पद्धतीने वरिष्ठ वर्गाचे ह्यदयपरिवर्तन करून अर्थव्यवस्थेत बदल घडवून आणता येतील असे त्यांनी प्रतिपादन केले. अशाप्रकारे अराज्यवाद, राष्ट्रवाद, समाजवाद आणि सत्याग्रही कार्यपद्धती यांच्या मिश्रणातून गांधींच्या आर्थिक विचारांना आकार प्राप्त झाला.

**ग्रामव्यवस्था व यंत्रसंस्कृती यामध्ये साधर्म्यता**

गांधींनी १९०९ साली लिहिलेल्या, 'हिंद — स्वराज्य' या ग्रंथांत इंग्लंडमधील कार्लाईत, रस्किन इत्यादी आदर्शवादी तत्वचिंतकांच्या विचारांचा अनुवाद केलेला आहे. समाजवाद्यांप्रमाणे या आदर्शवाद्यांचाही भांडवलशाहीला विरोध होता; परंतु त्यांचा रोख भांडवलशाहीतील सामाजिक अन्यायापेक्षाही तिच्यामुळे वैयक्तिक जीवनात निर्माण झालेल्या अनिष्ट प्रवृत्तींना होता. कारखान्यातील यंत्रावर काम करणारा कामगार त्या यंत्राचाच एक भाग बनून राहतो. त्याचा उत्साह, सृजनशीलता, निर्णयशक्ती यांना ओहोटी लागते. निसर्गापासून त्याची फारकत होते. भोगाच्या मागे लागल्याने स्वत:च्या अंतरात्म्याचा त्याला विसर पडतो. त्याच्या जीवनातील सहजता, शक्ती, समाधन नाहीशी होतात असे त्यांचे म्हणणे होते. म्हणून यंत्र संस्कृतीतून आलेली कृत्रिमता नष्ट करण्यासाठी परत निसर्गाकडे वळण्याचा त्यांनी सल्ला दिला. अधिकाधिक सुखोपभोगाच्या मागे लागण्याऐवजी माणसाने आपल्या गरजा मर्यादित ठेवण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादित केली. मानवाच्या भौतिक सुखांपेक्षा त्याच्या नैतिक विकासाला त्यांनी अधिक महत्व दिले. छोटया छोटया गटांचे स्वावलंबन आणि सहकार्य यामधून भांडवलशाहीला शह देता येईल आणि सत्तेचे केंद्रीकरण टाळून र्प्यायी समाजव्यवस्था उभी करता येईल अशी त्यांनी विचारसरणी होती. या विचारसरणीला अनुसरून गांधींनीही हिंद—स्वराज्य या ग्रंथात आधुनिक यंत्रधिष्ठित पाश्चात्य संस्कृतीवर कडाडून हल्ला चढविला आहे. ही संस्कृती माणसाला भौतिक सुखाची नवी नवी साधने उपलब्ध करून देते; आणि त्याचा शारीरिक व मानसिक अध:पात घडवून आणते अशी त्यांची टिका होती. एकविसाव्या शतकामध्ये भारतीय समाजमनामध्ये होत असलेले परिवर्तन आणि गत्यानुगतीक झालेल्या सामाजिक अवस्थेतून गलीतगात्र अवस्थेत चाललेला समाज ह्यामध्ये त्याचे प्रतिबिंब जाणवते. त्यातून गांधींच्या ग्रामराज्याची प्रासंगिकता ध्वनीत होते[४].

भारताचा आधुनिक यंत्रसंस्कृतीशी प्रथम परिचय इंग्रजी राजवटीमध्ये झाला. तेव्हापासून भारताच्या अधोगतीला सुरूवात झाली. सैन्याच्या वाहतुकीची सोय करून रेल्वेने इंग्रजी सत्ता सुस्थिर होण्यास मदत केली. दळणवळणाची वाढझाल्यावर रोगजंतूंचा प्रसार होऊन प्लेगसारख्या साथींचा उदभव झाला. रेल्वेमुळे नव्या बाजारपेठा अस्तित्वात आल्या. शेतकरी पैशाच्या आशेने आपले धान्य बाजारात विकू लागले. त्यामुळे दुष्काळात त्यांच्यावर उपासमारीची पाळी आली. वकिलांनी इंग्रजी कोर्टाची प्रतिष्ठा वाढविली. स्वार्थाच्या आशेने लोकांमधील तंटयांना त्यांनी उत्तेजन दिले. डॉक्टरांनी औषधांची सवय लावून लोकांना संयमापासून परावृत्त केले. भारताच्या पराभवाला पाश्चात्यांपासून आपण आत्मसात केलेली ही भोगप्रधान संस्कृतीचा कारणीभुत आहे.

**ग्रामव्यवस्था आणि विश्वस्त जीवन**

भारताची आर्थिक उन्नती व त्याचे स्वरूप यासंदर्भात महात्मा गांधीचे विचार संस्मणीय आहेत. गांधीच्या धर्माचरणात अपरिग्रह व्रताला महत्वाचे स्थान होते. 'गरजा कमी करा' या उपदेशामधुन त्यांनी दारिद्र्याचाच उदोउदो केला असा त्यांच्याविरूद्ध आक्षेप घेतला जातो. परंतु अपरिग्रहाचा, मनोनिग्रहाचा उपदेश त्यांनी देशातील श्रीमंतांना, मध्यमवर्गीयांना, राजकीय कार्यकर्त्यांना केलेला होता. 'ज्यांच्यापाशी सुखोपभोगाची साधने आहेत किंवा ती मिळविण्याची ज्यांना शक्यता आहे त्यांच्याच अपरिग्रहाला, त्यागाला काही अर्थ असतो. हा त्याग कुणी कुणावर लादता कामा नये. तर समाजसेवकांनी गोरगरिबाशी समरस होण्याच्या भावनेने आपण होऊन त्यागमय जीवन स्वीकारले पाहिजे. असे गांधीजींचे म्हणणे होते. भारतासारख्या दरिद्री देशात सामान्य माणसाच्या प्राथमिक गरजाही जोपर्यंत भागविल्या जात नाहीत तोपर्यंत काही भाग्यवान धनिकांनी स्वत:च्या चैनीसाठी देशाच्या संपत्तीची उधळपट्टी करणे अनैतिक आहे. ही समतावादी संकल्पनाही त्यांच्या विचारात अभिप्रेत आहे. आजच्या परिस्थितीत ती अधिकच प्रासंगिक आहे[५].

या संदर्भात गांधीजींचा दृष्टिकोन भारतातील पुर्वीचे अध्यात्मवादी तत्वज्ञ आणि भक्तिमार्गी संत यांच्या दृष्टिकोनाहून अगदी वेगळा आहे. जुन्या चैतन्यवादी तत्वज्ञांना लोकांच्या आध्यात्मिक उन्नतीची चिंता होती. परंतू त्यांच्या भौतिक जीवनाबद्दल ते पुर्णपणे उदासीन होते. संपत्ती ही परमार्थमार्गातील एक धोंड होय तशीच उत्कर्ष हीच त्यांच्या नैतिक उन्नतीची पहिली पायरी होय. आत्यंतिक दारिद्रय माणसाला लाचार, भित्रा, नेभळट बनविते. माणूस म्हणून जगण्यासाठी प्रत्येकाला समतोल आहार, पुरेसा कपडालत्ता, राहण्यासाठी घर, शिक्षण आणि आवश्यक ती वैद्यकीय मदत मिळालीच पाहिजे असे गांधींचे आवर्जुन सांगणे होते. आपली स्वराज्याची कल्पना विषद करताना 'स्वराज्यात प्रत्येक खेडे एक स्वायत लोकराज्य असेल. जीवनावश्यक वस्तुच्या बाबतीत ते स्वावलंबी राहील. इतर बाबतीत खेडी परस्परावलंबी राहतील. खाण्यासाठी अन्न व वस्त्रासाठी कापूस यांच्या उत्पादनाला तेथे अग्रक्रम मिळेल. तेथे गुरांसाठी कुरणे आणि मुले व मोठी माणसे यांच्यासाठी क्रीडांगणे राखून ठेवली जातील. या गरजा भागल्यावर त्या खेडयांपाशी अधिक जमीन असेल तर गांजा, तंबाखू, अफु अशी मादक द्रव्ये सोडून शेतकरी विक्रीसाठी इतर जिनसांचे उत्पादन करतील. प्रत्येक खेडयात एक नाटयगृह शाळा आणि सार्वजनिक सभागृह उघडण्यात येईल. पिण्यासाठी स्वच्छ पाणीपुरवठयाची सोय केली जाईल[६]. असे चित्र त्यांनी रेखाटले आहे. सांप्रत परिस्थितीत हे चित्र प्रत्यक्षात उतरविणे आत्यंतिक गरजेचे आहे

**निष्कर्ष**

आज जागतिकीकरणाच्या परिप्रेक्ष्यामध्ये गांधी पुरस्कृत ग्रामजीवनाच्या व ग्रामस्वराज्याच्या स्विकार्यतेचे औचित्य कधी नव्हे ते जाणवू लागले आहे. भारताच्या समन्यायी विकास—ध्येयाचा सर्वसमावेशक आकृतीबंध या विचारातून अधोरेखित होतो. गांधीजींनी हिंदस्वराज्य ग्रंथातून या संदर्भात मांडणी करतांना स्वतंत्र्य भारतातील महिलांचा आर्थिक व सामाजिक विकास, बालविकास आणि सामाजिकदृष्टया दुर्बल वर्गीकृत जाती व जमातींच्या उत्थानावर भर दिलेला होता. आज मानव्य विकास व प्रादेशिक असमतोल या संदर्भात चार महत्वाच्या समस्यासंबंधी लक्ष केंद्रित करणे क्रमप्राप्त आहे. जमीन व जलव्यवस्थापन, संशोधन व विस्तार, पत पुरवठा आणि भावनिश्चिती धोरणसहित विपणन यांचा अंतर्भाव यामध्ये होतो.

भारतात दलितांमधील गरीब उत्तर प्रदेश, बिहार आणि पश्चिम बंगाल या राज्यातील ग्रामीण भागात अधिक प्रमाणात आहेत. शहरी भागातील गरीब दलितांचे प्रमाण मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, बिहार, गुजरात व महाराष्ट्र या राज्यांमध्ये अधिक आढळून येते. सर्वसमावेशक विकास कार्यक्रमास सर्वोच्च प्राधान्य दिल्याशिवाय पर्याय नसल्याचे मत योजना आयोगाचे सन्माननीय सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले आहे. याच आशयाचा अहवाल प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी सुद्धा भारत सरकारकडे सादर केलेला आहे. याचा आशय असा की, या देशातल्या लाखो—करोडो वंचितांचे प्रश्न व त्यातून व्यवस्थेच्या विविध पातळीवर निर्माण होणारे ताणतणाव आणि विषमता कमी होण्यास मदत होणार आहे. त्यातून निर्माण होणारी नवी परिस्थिती सर्वांगिण आर्थिक विकासास सहायक सिद्ध होईल.

जगतिकीकरणाच्या परिप्रेक्ष्यामध्ये भारताच्या सर्वांगिण उत्थानाची योजना साकार करण्यासाठी ग्राम्य जीवनातील आर्थिक प्रश्नास सर्व अंगाने समजून—उमजून 'प्रगतीचा मानवी चेहरा' प्रत्यक्षात कसा उभा करायचा ही खरी व्यवस्थेपुढची मूलभूत समस्या आहे. या समस्येचे मूलस्त्रोत भारतीय ग्राम्य संस्कृतीमध्ये असल्यामुळे ग्रामीण विकासाच्या नानविध प्रारूपांना व्यक्ती, कुटूंब, गाव आणि देश पातळीवर तपासणे क्रमप्राप्त ठरते. कारण आज जागतिकीकरण संपूर्ण मानव समुदायाच्या जगण्याचे अपरिहार्य अंग म्हणून आकारास आले आहे. या अपरिहार्यतेचा थेट संबंध मानव समुदायाच्या अस्तित्वाशी आहे. भारतीयांचे अस्तित्व आणि अस्मिता ग्रामीण जनसमुदायाशी निगडीत असल्यामुळे व ग्राम स्वावलंबनाचा सहसंबंध ग्रामस्वराज्याशी असल्यामुळे गांधीप्रणित ग्रामस्वराज्य संकल्पना अधिक प्रासंगिक ठरते.

महात्मा गांधी पुरस्कृत 'ग्राम स्वराज्य' संकल्पनेच्या माध्यमातून भारतातील काही निवडक राज्यांमध्ये रचनात्मक कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्याचे परिणाम सुद्धा सकारात्मक स्वरूपाचे आहेत. महाराष्ट्रात राळेगणसिद्धी, हिवरे बाजार, हेमलकसा, मेंढालेखा, झाडा, रामेश्वर, काटेवाडी, वरध, निहल, जांभरूण महाली या गावामध्ये राबविण्यात आलेले 'प्रकल्प व योजना' म. गांधी पुरस्कृत ग्रामस्वराज्य संकल्पनेची प्रासंगिकता अधोरेखित करते. तथापि अजूनही विकासाची मोठी झेप घेण्यासंबंधीची तीव्र इच्छाशक्ती राज्यसंस्थेमध्ये दिसत नाही. 'मनरेगा' चा अपवाद वगळता नव्यानेच अंमलात आलेला अन्नसुरक्षा कायदा, भूसंपादन कायदा व नुकताच संमत वादग्रस्त कृषि कायदा वरवरची मलमपट्टी आहे. खऱ्या अर्थाने स्वावलंबी ग्रामव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी 'ग्रामसंरचना' केंद्रस्थानी धरून उपलब्ध मानस संसाधनाची व्यवहार्य जुळवाजुळव गांधी मार्गाने करावी लागेल त्यातून ग्रामस्वराज्याची प्रस्थापना होण्यास मदत होईल. सर्वव्यापी, सर्वांगीण विकासाच्या प्रक्रियेला गती येईलत्र जागतिकीकरणाचे आव्हान पेलण्याचे सामर्थ्य व्यवस्थेत निर्माण होण्यासाठी गांधी पुरस्कृत रचनात्मक कार्यक्रम एक सक्षम पर्याय होय.

दलित, पिडित, वंचित व्यक्तीच्या जीवनाला योग्य आकार प्राप्त करून देण्यासंबंधी सक्रिय भूमिका शासनाद्वारे पार पाडण्यातच लोकशाहीचे खरे गमक दडले आहे. शासनाच्या सत्तेचे मूलस्त्रोत जनता आहे. जनता—जनार्दनाच्या अधिमान्यतेतूनच राज्याचा विकास झालेला आहे. राज्याचे अंतिम ध्येय 'शांततामय सहजीवनयुक्त स्वस्थ आणि कल्याणकारी राज्याची प्रस्थापना करणे' हे आहे. म. गांधींनी लोकतांत्रिक संरचनेच्या माध्यमातून ग्रामीण वंचितांच्या जीवनात सुख, समाधान व शांती प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने 'स्थानिक स्वशासन व वंचितांच्या उत्थान' कार्यक्रमावर प्राधान्याने भर दिला होता. कायद्याचे राज्य प्रस्थापित

करतांना ग्रामीण भागातील मागासलेल्या जाती समूहांचा सत्तेतील सहभाग वाढविण्यावर त्यांनी भर दिला होता. सहभागी लोकशाही व सहभागी विकासाच्या समिकरणातूनच लोकशाही व्यवस्था बळकट होईल असा आशावाद गांधीजींनी वेगवेगळया संदर्भात व्यक्त केला होता.

आज भारतामध्ये प्रस्थापित झालेले 'पंचायत राज' व्यवस्थेचे मॉडेल म. गांधीच्या स्वशासन व सामाजिक अभिव्यक्तीचे प्रतिबिंब होय. जनमत, शेतीपूरक उद्योगधंदे, विकेंद्रीत अर्थव्यवस्था, स्वावलंबन तथा आत्मनिर्भरता, सत्य व अहिंसा या तत्वांवर आधारित ग्रामीण समाज खऱ्या अर्थाने आदर्श समाज असणार आहे. अशा समाजामध्ये जीवन जगणारा व्यक्ती लोकतांत्रिक शासनाचा निर्माता राहिल. शासन व जनता दोघेही अहिंसेच्या नियमाने बांधलेले असल्यामुळे व्यापक जनहितासाठी व पर्यायाने गावाच्या प्रतिष्ठेसाठी उचित प्रसंगी त्याग करण्यास देखील तत्पर राहतील. सत्य व अहिंसा तत्वावर आधारित गावामध्ये खऱ्या अर्थाने रामराज्य अर्थात ग्रामस्वराज्य प्रस्थापित झालेले असेल. एक समस्यामुक्त, चिंतामुक्त, भयमुक्त आणि खऱ्या अर्थाने शांततामय सहजीवन व्यतीत करणारे राज्य 'ग्रामस्वराज्य' ज्याची आज कधी नव्हे ती निकड भासत आहे.

**संदर्भ सूची :**

१. Choudhury, R., Bapu as I Saw Him, Ahmedabad, Navjivan Press, 1950. Collected Works of Mhatma Gandhi, Vol. 20 to 80 Publication Division New Delhi 1958-1974
२. Fischer, Louis, Gandhi: His Life and Message for World, New York, New American Library, 1982.
३. Gandhi M.K. Panchayat Raj, Navjivan Publishing House Ahmedabad, 1959.
४. पांढरीपांडे सु.श्री. महात्मा गांधींचे हिंद स्वराज्य आणि नवे मन्वंतर, प्रतिका प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१०.
५. गांधी कनकमल संपादन (महात्मा गांधी), रचनात्मक कार्यक्रम अध्यात्म और विज्ञान का समन्वय.
६. Bhambhri, C.P. Globalization India Nationa, State and Democracy Shipra Publications, Delhi, First Edition 2005.